/ FYBMM(M) LM3ACT 7/3/13 (9)
Translation Skills (Lib)

वेळ : २ तास गुण : ६०

**सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

प्रश्न १ ला - अनुवादातील मूल्यांची संकल्पना स्पष्ट करा (१५)

**किंवा**

प्रश्न १ ला - अनुवादाकडे कोणकोणती कौशल्ये आवश्यक असतात? (१५)

प्रश्न २ रा - पुढील बातमीचे इंग्रजीमध्ये भाषांतर करा (१५)

## इस्टर्न फ्रीवे अंतिम टप्प्यात

### शेवटचे गर्डर लाँचिंग सात फेब्रुवारीला

### मार्च अखेरपासून वाहतूक होणार सुरू

मुंबई, (विशेष प्रतिनिधी) -

घाटकोपर ते फोर्टपर्यंतचा प्रवास अवघ्या २० मिनिटांत शक्य करणाऱ्या इस्टर्न फ्रीवेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. अखेरच्या टप्प्यातील गर्डर्स बसविण्याचे काम सुरु झाले असून ७ फेब्रुवारी रोजी शेवटचा गर्डर ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे, मार्च अखेरीस या रस्त्यावरून वाहतूक सुरू होण्याची शक्यता आहे.

मुंबईची पूर्व उपनगरे आणि नवी मुंबईतून दक्षिण मुंबईकडे येणाऱ्या वाहनांचा प्रवास जलद व्हावा यासाठी जानेवारी २००८ मध्ये इस्टर्न फ्रीवेचे काम सुरु झाले. घाटकोपर ते फोर्टपर्यंत या १७ किमीच्या आणि सुमारे ११०४ कोटींचा खर्च असलेल्या या रस्त्याचे काम तीन टप्प्यात सुरू होते.

घाटकोपर ते फोर्ट अशा थेट प्रवासासाठी आणखी एक मार्ग उपलब्ध झाल्याने बेस्टसह नवी मुंबई परिवहन सेवा, एसटी यांनाही हा रस्ता विनामूल्य वापरता येईल. रस्ता शहरांतर्गत असल्याने त्यावर टोल आकारला जाणार नाही.

**किंवा**

प्रश्न २ रा- पुढील बातमीचे हिंदीत भाषांतर करा (१५)

### डिझेल दरवाढीविरोधात

## 'मासेमारी बंद'

### कोकणात सोमवारपासून आंदोलन

रत्नागिरी, (प्रतिनिधी) -

आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या मच्छिमारीच्या व्यवसायाला डिझेल दरवाढीचा फटका बसला असून या दरवाढीच्या निषेधार्थ कोकणातील मच्छिमार संघटनांनी येत्या सोमवारपासून मासेमारी बंद आंदोलन पुकारले आहे. राज्यात पंधरा हजार मच्छिमार बोटी बंद ठेवण्यात आल्याची माहिती कोकण मच्छिमार लाँच संघाचे उपाध्यक्ष महालदार यांनी दिली.

डिझेलचे दर वाढवल्यामुळे १८ जानेवारीपासून मच्छिमार संघांनी डिझेलची उचल केलेली नाही. डिझेलच्या सवलतीच्या दरात ७ रुपये वाढ झाली आहे. डिझेल दरवाढीमुळे दाभोळ मिरकरवाडा, कर्ला, वरवडे, भाट्ये बंदरातील अनेक नौका आत्ताच किनाऱ्यावर उभ्या आहेत. आठवडाभरासाठी समुद्रात गेलेल्या नौका शुक्रवारी परतल्यानंतर कोकणातील मच्छिमारी पूर्ण बंद पडेल, असे संघाचे अध्यक्ष मांजगावकर यांनी सांगितले.

३ रा - पुढील जाहिरातीचे इंग्लिशमध्ये भाषांतर करा (१५)

**आता मागेपुढे पाहू नका... घर घ्या..**

**DHFL**

**प्रति लाख रुपयांसाठी ७७२ रुपये इतका कमी इएम्आय**

- ☐ डीएचएफएलची ईझी ईझी गृह कर्ज ऑफर
- ☐ तुम्हाला तुमच्या स्वप्नातलं घर घ्यायला मदत करणार
- ☐ प्रारंभिक व्याज दर ८ टक्के

**यापेक्षा जास्त सोपं आणि**

**सुलभ काय असू शकेल ?** **DHFL**

*आजच संपर्क करा*

निःशुल्क कॉल करा- १८००२२३३४४ किंवा

DHFL असा sms ५५६७७ वर करा

**किंवा**

प्रश्न ३ रा - पुढील जाहिरातीचे हिंदीमध्ये भाषांतर करा (१५)

**शिकायला सोपं.**

**पैसे भरायला सोपं.**

**जेटकिंग**

| |
|---|
| तुमच्या हप्त्यांवर<br>० टक्के व्याज<br>रुपये ४,२०० पर्यंत बचत करा<br>आताच नाव नोंदवा ! |

- ☐ जेटकिंग आता तुम्हांला देतेय तुमची कोर्स फी ० टक्के व्याजाने सुलभ हप्त्यात भरण्याची सोय
- ☐ आमच्या १५ महिन्यांच्या JCHNP किंवा १२ महिन्यांच्या JCHNE कम्प्युटर हार्डवेअर ॲण्ड नेटवर्किंग कोर्सेसमधून निवड करा.
- ☐ आपले कम्प्युटर इंजिनिअर बनण्याचे स्वप्न साकार करा
- ☐ आताच नाव नोंदवा आणि ह्या आकर्षक ऑफरचा लाभ घ्या

**१०+२ उत्तीर्ण, प्रवेश प्रारंभ**

प्रश्न ४ था अ - पुढील बातमीचा मराठीत अनुवाद करा (५)

**Snow Causes travel**

**Chaos across Europe**

Air, Road and Rail traffic across much of Eurpoe suffered major disruptions on Monday as heavy snow and freezing weather gripped the continent. The problems at airports were particularly severe. More than on in 10 flights were scrapped at Heathrow in London. 40 percent in Paris and more than a quater at Frankfurt.

**किंवा**

प्रश्न ४ था अ - पुढील बातमीचा मराठीत अनुवाद करा (५)

**गिल्डने बनाई आचारसंहिता समिती**

कुछ मीडिया संगठनों में धन लेकर समाचार देने की बढती खबरों पर गहरी चिंता जताते हुए एडीटर्स गिल्ड ऑफ इंडिया ने आचारसंहिता समिती का गठन किया है। जो इस हानिकारक चलन के मद्देनजर पारदर्शिता को बढावा देने के बारे मे सुझाव देगी । गिल्ड का वार्षिक साधारण बैठक में संस्था ने ध्यान दिलाया गया की वह हमेशा ऐसी खबरों को छापने के पक्ष मे है, जो जनहित में हो ।

प्रश्न ४ था ब - पुढील जाहिरातीचा मराठीत अनुवाद करा (५)

**FIVE YEARS OF**

**INSTITUTIONAL EXCELLENCE**

ROBUST FINANCIAL PERFORMANCE

FINEST HUMAN CAPITAL

SERVICE EXCELLENCE

KNOWLEDGE BANKING

RESPONSIBLE BANKING

Institutional 5 Excellence

**YES BANK**

प्रश्न ४ था ब - पुढील जाहिरातीचा मराठीत अनुवाद करा (५)

**एम टी एन एल**

संपूर्ण दूरसंचार सेवा प्रदाता

**Trump Card**

**आपली बातें हों**

**लम्बी**

या

**छोटी**

एमटीएनएल के पास

है हर एक

के लिए परफेक्ट

प्लान

| छोटी बातें | लम्बी बाते |
|---|---|
| १/२ पैसा / सेकंद | 48 पैसे / मिनिट |
| 'पेपर सेकंड' कूपन | 'बोनस कूपन 48' |
| के साथ | के साथ |

प्रश्न ४ था **क**- टीपा लिहा कोणतीही एक (५)

१. जेकॉबसने अनुवादाचे प्रकार

२. अनुवादातील परावलंबित्व

---------------XXX---------------